तात्काळ

**अ.शा.पत्र** क्रमांक :इमाव २००७/प्र.क्र.१५० /मावक-३
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**
दिनांक :-२८ जुलै, २००९


**किशोर गजभिये**
**सचिव**


विषय:-अनुसूचित जाती, विजाभज व विमाप्र व इमाव विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत

प्रिय ~~श्री.~~ डॉ. महाजन

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये राज्यातील खाजगी विनाअनुदानीत व कायम विना अनुदानीत व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण-या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याबाबत सामाजिकन्याय विभागाने निर्णय घेतला आहे. सोबत शासन निर्णयाच्या प्रती जोडल्या आहेत.

२. त्यानुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना १०० टक्के दराने शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे, तर इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ५० टक्के दराने प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे. याकरीता शासनाने आवश्यक ती तरतूद केलेली आहे. ही बाब विचारात घेता अनुसूचित जाती, विजाभज, विमाप्र व इमाव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेश घेतेवेळी शैक्षणिक शुल्काची मागणी करु नये अशा प्रकारे आपल्या स्तरावरुन सर्व संबंधित महाविद्यालयांना तातडीने कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मला अवगत केल्यास मी आपला आभारी राहीन.

सस्नेह !

**आपला,** स्नेहांकित

**( किशोर गजभिये )**

डॉ.सुभाष महाजन,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य मुंबई.